# शाहूंचे महिलांसाठीचे कार्य अलौकिक


म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'ज्या काळात जगभरातील महिलांमध्ये नुकतीच सक्षमीकरणाची जाणीव मूळ धरण्यास सुरवात झालेली होती, त्या काळात महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा करणाऱ्या कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अलौकिक स्वरुपाचे आहे', असे मत जगप्रसिद्ध ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रथम महिला कुलगुरू लुईस रिचर्ड्सन यांनी मुंबई येथे व्यक्त केले.

## ऑक्सफर्डच्या कुलगुरू लुईस रिचर्ड्सन यांचे मत

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या आठशे वर्षांच्या इतिहासात श्रीमती रिचर्ड्सन यांच्या रुपाने कुलगुरूपद भूषविण्याची संधी एका महिलेस प्रथमच मिळाली आहे. त्या नुकत्याच भारत दौऱ्यावर आल्या असता मुंबईतील ब्रिटीश कमिशनरेटमध्ये भारतातील शिक्षण क्षेत्रातील निवडक मान्यवरांशी त्यांनी संवाद साधला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा समावेश होता. या भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. शिंदे यांनी श्रीमती रिचर्ड्सन यांना शाहू महाराजांचा चरित्रग्रंथ भेट दिला.

रिचर्ड्सन म्हणाल्या, 'भारतातील एखाद्या महान समाजसुधारक राजाविषयी मला भेट मिळालेले हे पहिलेच पुस्तक आहे. शाहू महाराजांचे कार्य हे काळाच्या पुढचे आहे. सामाजिक विषमता दूर करून शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडविण्याचे त्यांचे कार्य तत्कालीन भारतामध्ये अत्यंत महत्त्वाचे ठरले.' हा संपूर्ण ग्रंथ मुळापासून वाचण्याची आता ओढ लागली आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.



राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या कुलगुरू लुईस रिचर्ड्सन यांना प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

कुलगुरू डॉ. शिंदे हे ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मानद प्रोफेसर असून गतवर्षी त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात तेथील शास्त्रज्ञांसमवेत सुमारे महिनाभर संशोधन कार्य केले. त्यावेळी त्यांनी कुलगुरू रिचर्ड्सन यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली होती. तेथील संशोधन कार्याविषयीही यावेळी चर्चा झाली.

12 OCT 2018 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK asks colleges to submit NAAC accreditation action plan by Oct 15

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has asked all its affiliated colleges —yet to go through the National Assessment and Accreditation Council (NAAC) accreditation — to submit their action plan for the same by October 15.

In a circular, dated October 5, it said that the NAAC accreditation is mandatory for all colleges in the region and an action plan needs to be created by those who are yet to comply with the norm.

D T Shirke, SUK pro-VC, said, "We want to know the current status of the colleges in regard with their NAAC preparation. We want to see if they have data to apply for the same or are ready to face the panel. If they are not prepared, we might need to extend a helping hand in terms of expertise to these colleges."

He added that last month a workshop to guide the requirements of NAAC accreditation was organised for the un-aided colleges. "More such workshops are on the cards to ensure that involvement of colleges increases in the procedure," he said.

According to Shirke, the varsity has already vowed that all the affiliated colleges will go through the NAAC accreditation by the year 2024 and this is the first step towards achieving this goal.

"By giving them an action plan, the colleges can go through the process at the earliest and start working on areas that need attention," he said.

He added that NAAC accreditation is a mandatory norm and funding through the Union Grants Commission (UGC) and Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA) can be availed in many cases only if an institute has got the assessment and required grading.

It should be noted that the UGC in its public notice on April 13, 2016 had said that a college with highest accreditation in three cycles of NAAC assessment will be granted an autonomous status that is also another reason for colleges to apply for accreditation.

The NAAC is an autonomous body established by the UGC to assess and accredit institutions of higher education in the country.

## विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप इग्निशन बाबत एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. विद्यार्थ्यांच्या स्वकल्पनेतून नवीन व्यवसाय निर्मितीसाठी इन्क्युबेशन सेंटरची कशाप्रकारे मदत होईल याबाबत या कार्यशाळेत डॉ. आर. के. कामत यांनी माहिती दिली. विभागप्रमुख डॉ. जयदीप बागी, मनीष पाटील, डॉ. एस. बी. समुद्रे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 OCT 2018
तरुण भारत

# विवेकानंद महविद्यालयात गणित परिषद उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या गणित विभागाच्या वतीने advances in differential equations 2018 या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. या राष्ट्रीय परिषदेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील गणित विषयाच्या प्रोफेसर वर्षा गेज्जी व प्रा डॉ. सुभाष केंद्रे तसेच बीटस कॅम्पस, गोवा येथील प्रा. डॉ. पी धनूमंजया व प्रा. डॉ. ए के पूंदर उपस्थित होते. परिषदेच्या उद्‌घटन प्रसंगी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संथेच्या सेक्रेटरी प्रा. सौ शुभांगी गावडे, बीजभाषक म्हणून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील गणित विषयाच्या विभाग प्रमुख प्रोफेसर सौ. सरिता ठक्कर व महाविद्यालयाच्या आय. क्यू. ए. सी समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित होत्या.परिषदेत संशोधकांनी आपले संशोधनपर सादर केले. या परिषदेस श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा.अभयकुमार साळुंखे व विवेकानंद कॉलेजचे प्रा. डॉ. एस वाय होनगेकर यांचे सहकार्य लाभले. परिषदेचे समन्वयक म्हणून प्रा. एस. पी. पाटणकर व प्रा. एस टी. सुतार यांनी काम पाहिले.